# लढाई संपली- युद्ध चालूच आहे !

एस्. एम्. जोशी

प्रकृती तितकीशी बरी नव्हती तरीपण उमरग्याला सतरा तारखेला जायचे कबूल करून बसलो.

उस्मानाबाद जनता सहकारी बँक शाखेचे उद्घाटन करायचे होते.

माझे मित्र शेपराव कठारे यांचा आग्रह मोडता आला नाही.

दिनांक १६ च्या सायंकाळच्या सिकंदराबाद एक्स्प्रेसचे पुणे-सोलापूरचे तिकिट घेऊन बसण्यापुरती जागा आरक्षित करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे दिनांक १५ लाच तिकिट हाती आले.

जागा रिझर्व्ह केलेली असल्यामुळे गाडी सुटण्यापूर्वी पंधरा मिनिटे स्टेशनवर पोचलो. तिकिट तपासनिसाकडे चौकशी केली की माझी जागा कोठल्या डब्यात येईल ? त्याने माझे तिकिट निरखून पाहिले आणि म्हणाला, "हे तिकिट तर सिकंदराबाद पॅसिंजरचे म्हणजे रात्रीच्या गाडीचे आहे. एक्स्प्रेस गाडीने जायचे असेल तर हे तिकिट परत करून नवे घ्यावे लागेल !"

विचार करायला वेळच नव्हता. सामान, माझे मित्र शंकरराव आगाशे यांच्याकडे देऊन मी झपाट्याने जिना चढून पहिल्या प्लॅटफार्मकडे निघालो.

माझी धावपळ रेल्वे पोलिसांपैकी एका मित्राने पाहिली आणि माझ्यापाशी येऊन विचारपूस केली. ही मित्रमंडळी अडचणीच्या वेळी मला नेहमीच मदत करतात. अगदी आणीबाणी चालू होती त्यावेळी देखील.

त्यांनी दोनचार मिनिटांतच माझे तिकिट बदलून आणले आणि मला बत्तीस नंबरच्या जागेवर बसायला सांगून ते निघून गेले !

मी आपल्या जागेवर जाऊन बसलो आणि बरोबर आणलेली वर्तमानपत्रे वाचायला सुरवात केली. दररोज करायचे ते होमवर्कच असते. ते पूर्ण करावेच लागते !

बाकावर मधल्या जागी असल्यामुळे वाचायला पुरेसा प्रकाश नव्हता. माझ्या समोरच्या बाकावर बसलेल्या एक गृहस्थांनी सांगितले, "तुम्ही खिडकीजवळ बसू शकता. ती जागा आमचीच आहे."

त्यांनी दाखवलेल्या सहानुभूतीबद्दल मी हसून दाद दिली आणि तिकिटाची भानगड कशी झाली ते सांगितले.

त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, "काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असते तर त्यांच्याबरोबर लवाजमा असता. मदतीला माणसे असती. तुम्ही तर एकटेच पिशवी घेऊन धावपळ करता आहात !"

"माझ्या मदतीलादेखील पुष्कळ लोक असतात. कोणी नसला तर आमचे पोलिस अधिकारी नेहमीच धावून येतात. शिवाय असला गोतावळा आणि लवाजमा बरोबर घेणे मला आवडत नाही. खरे सांगायचे, तर काँग्रेसवाल्यांचे एक टोक आणि आमचे दुसरे, पण अगदी एका टोकाला जाणेदेखील आता परवडत नाही. गैरसोयीचे होते. पण आमचे जीवनच असे घडत आले आहे की आता त्यामध्ये फरक पडेलसे वाटत नाही !"

थोडा वेळ मला माझे वाचन करू दिल्यावर त्या [...]
सुरवात केली. महाराष्ट्रातील राजकारणाला [...]
लागेल, म्हणून प्रश्न केला.

जिज्ञासू भेटला की शिबिर सुरू करायचे, हा माझा
आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रातही एकाच पक्षाचे रा[...]
संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर तर ते अधिक[...]
सत्ताधाऱ्यांना विरोध असा खपतच नाही. सर्व सत्ता [...]
मान्यता आपल्या पक्षालाच मिळाली पाहिजे असा [...]
दिसतो. १९६७ साली पुण्यातून माझी लोकसभेवर [...]
वास्तविक त्यामुळे यशवंतरावांसारख्या लोकशाहीबद्द[...]
णाऱ्या मान्यवर नेत्याला फारसे दुःख व्हायला नको [...]
पण त्यांनी त्याबद्दलचे दुःख कित्येक वेळा आणि [...]
काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलून दाखवले
राष्ट्रातही सत्ताधारी पक्षाला पर्याय देऊ शके[...]
पाहिजे. मी त्या उद्दिष्टाला अग्रक्रम देतो.

महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाचे पुढारी जरी [...]
असले तरी, (साखर कारखान्याचा अपवाद वगळता
उद्योगाला पुरेसे महत्त्व दिलेले नाही. उलट परदेशातू[...]
आणून देशामध्ये त्याची विक्री केल्यामुळे शेतीला [...]
ठरणारी धोरणे त्यांनी उचलून धरली आणि [...]
कायम रहावी म्हणून धनिक वर्गातील कारखानदा[...]
उद्दिष्टांना अग्रक्रम दिला.

ही स्थिती बदलल्याशिवाय आपला तरणोपाय नाही
मोडी लक्षात घेता महाराष्ट्रात आपल्याला जे [...]
साठी वातावरण अनुकूल आहे. मात्र जनता [...]
आपल्या त्यागाचा आणि शुद्धतेचा फाजील अहंकार
आपला प्रश्न नुसता आर्थिक नाही. त्यातील सामाजि[...]
अतिशय महत्त्वाचा आहे. आम्ही महात्मा फुले [...]
आंबेडकर यांच्याबद्दल अभिमानाने बोलत असतो [...]
वण अमलात आणण्यासाठी फारसे काही करीत [...]
महात्मा फुल्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला [...]
स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी हाडाची काडे केली [...]
जवळपास शंभर वर्षे होऊन गेली. त्यांनी मुक्त केले[...]
झालेली नाही. स्त्रियांच्या शिक्षणाबाबत प्रगती [...]
दलितांच्या समतेचा प्रश्न मात्र तसाच रेंगाळत [...]
प्राप्तीसाठी जनशक्ती संघटित करणे अगत्याचे
म. गांधींनी अस्पृश्यता निवारणावर भर दिला [...]
तरुण पिढीवर चांगले संस्कार घडले. डॉ. बाबासा[...]
केन्द्रीय मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला

त्यांच्याकडेच घटना बनवण्याचे काम आले. म्हणूनच अस्पृश्यता हा दंडपात्र गुन्हा ठरवण्यात आला. भारतातील सर्व जाति-जमातींच्या लोकांचा दर्जा समान आहे असे कायद्याने तरी ठरले, परंतु घटनेने दलितांना दिलेले समान हक्क अजून तरी पुस्तकातच राहिले आहेत!

महात्मा फुल्यांच्या 'सत्यशोधक समाजा'चेही रूपांतर कालांतराने होत गेले आणि हळूहळू त्याला ब्राह्मणेतर पक्षाचे स्वरूप आले. सवर्णतेचा ब्राह्मणी अहंकार निश्चितच निषेधार्ह होता. त्याविरुद्ध लढा द्यायलाच हवा होता. सवर्णांनीदेखील आपण दलितांपेक्षा उच्च आहोत असे मानणे बरोबर नाही, हे लक्षात घेतले गेले नाही. दलितांना गावाबाहेर ठेवणे, त्यांना हीन लेखणे, हे चालूच आहे. महात्मा फुले आणि कोल्हापुरचे शाहूमहाराज यांनी अस्पृश्यता-निवारणासाठी जी महत्त्वाची कामगिरी बजावली, निरनिराळे उपक्रम सुरू केले, त्याचा आम्हाला विसर पडल्यासारखा झाला आहे.

संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर इथल्या सत्ताधारी पक्षाला एखाद्या लखोटबद्ध जातीचे स्वरूप आल्यासारखे जाणवते आणि मग आपल्याला जो पाठिंबा देणार नाही, त्याला पाण्यात पाहण्याची वृत्ती बळावू लागली. विरोधकांनी चांगली, विधायक कामे केली, तरी त्यात अडथळे निर्माण करायचे, असा खाक्या सुरू झाला! हे सारे लोकशाहीच्या दृष्टीने अनिष्ट आहे. त्यात बदल घडवून आणायला हवा. जनता पक्षाचे ते एक ऐतिहासिक कार्य आहे.

आमची चर्चा अगदी दिलखुलास झाली. ही मंडळी काँग्रेस पक्षाची आहेत, असे मला बऱ्याच वेळाने समजून आले. मनातल्या मनात मला त्यांचे कौतुक वाटले! चर्चा इतकी रंगली की, कुर्डुवाडीपर्यंत वेळ कसा गेला समजले नाही.

गाडी ठरल्या वेळी सोलापूर स्टेशनात दाखल झाली. मला घेण्यासाठी आमचे मित्र आनंद कोठारी, बाबा कुसुरकर, विमलचंद शहा स्टेशनवर आलेच होते.

आनंद कोठारी माझी सरबराई करावयास नेहमीच तत्पर असतात. मुक्काम त्यांच्याकडेच ठोकला. रात्री झोप चांगलीच झाली. सकाळी नऊच्या अगोदर स्नान वगैरे उरकून आम्ही बाबा कुसुरकरांच्या घरी जाऊन न्याहारी केली. बाबांचा गोतावळा मोठा. त्यांच्या बरोबरीने सर्वांची—स्त्री-पुरुष, मुलाबाळांचीदेखील त्यांनी ओळख करून दिली. उमरग्याचा कार्यक्रम दहाला होता. माजी मुख्यमंत्री श्री शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री आणि सध्याचे विधानसभेचे उपसभापती श्री शिवराज पाटील समारंभाचे अध्यक्ष. त्यांना यायला वेळ होता म्हणून आम्ही डाक बंगल्यात थोडा वेळ विश्रांती घ्यायचे ठरवले.

त्यामुळे फुरसतीचा फायदा घेऊन उमरग्याचे दलितांचे पुढारी श्री ... चव्हाण, कांबळे मला भेटण्यासाठी आले. जवळच पाच-सात मैलांवर असलेल्या अष्टे-जहागीर या गावातील दलितांचे गाऱ्हाणे त्यांनी निवेदन केले. त्याचबरोबर अचलेर गावच्या दलितांचा स्मशानभूमीबाबत निर्माण झालेला प्रश्नही मला समजावून दिला. त्यासाठी प्रथम चक्री उपोषण करून आता दलित समाजातील दोन मित्र तहसीलदार कचेरीपुढे बेमुदत उपोषण करीत आहेत, ही गोष्टही त्यांनी माझ्या निदर्शनाला आणली!

त्या दिवसाचा कार्यक्रम अगदी भरगच्च होता. तो पूर्ण करायचा, म्हणजे अष्टे-जहागीरला कसे जाता येईल? तरी पण आपण तेथे गेलेच पाहिजे, असे मला वाटले. जनता पक्षाच्या पुढाऱ्यांनी बाकीचे दैनिक कार्यक्रम गौण समजून दलितांवर होणाऱ्या अन्यायाच्या प्रश्नांना अग्रक्रम दिला पाहिजे, असे माझे निश्चित मत आहे. अष्टे-जहागीरला जाण्याचा माझा हा संकल्प आमच्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने गैरसोयीचा होता; पण मी त्याबाबत तडजोडीला तयार नव्हतो! '५-७ मैल अंतर आहे. सर्व रस्ता पक्का नाही, निदान तीन मैल तरी रस्ता कच्चा असून पावसामुळे जीपसुद्धा जाऊ शकायची नाही—' इत्यादी अडचणी त्यांनी पुढे केल्या. त्यांच्या मनातील आशय माझ्या लक्षात आला. पण मी स्वच्छ सांगून टाकले, 'जीप गेली नाही, तर पायी जाऊ! निसर्गाने पाय दिलेत ते केवळ लाथा मारण्यासाठी नाहीत. दलितांसाठी आता थोडे चालावे लागले तर काय बिघडते! जनता पक्षाला नुसतीच राजसत्ता हस्तगत करायची नाही, तिचा उपयोग सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी, दलितांचे प्रश्न सोडवण्यास करायचा आहे. फुले यांनी सुरू केलेले सामाजिक क्रांतीचे ऐतिहासिक काम पूर्ण करण्यास झटायचे आहे."

माझा हा आग्रह पाहून अष्टचाचे रहिवासी, पंचायत समितीचे माजी सभापती, यांना लोकांनी बोलावून घेतले. त्यांचा मुक्काम उमरग्यालाच होता. मुख्य प्रश्न पिण्याच्या पाण्याचा. तो सोडवण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत असे त्यांनीही आग्रहाने सांगितले.

उमरग्याचा कार्यक्रम आटोपल्याशिवाय मला अष्टे-जहागीरकडे जाणे शक्यच नव्हते. साथी पन्नालाल सुराणा बरोबर होते. ते आपणहून म्हणाले, "मला बँकेच्या कार्यक्रमासाठी हजर राहण्याची आवश्यकता नाही. मी, विमलचंद अगोदर अष्टे-जहागीरला जाऊन एकंदर परिस्थितीची पाहणी करतो. तुम्ही आपला कार्यक्रम संपवून तिकडे या!"

लगेच ते अष्टचाच्या पंचायत समितीच्या माजी अध्यक्षांसह तिकडे रवाना झाले.

एवढ्या वेळात श्री शिवराज पाटील कार्यक्रमासाठी तयार होऊन आले!

मी त्यांनाही अष्टचाच्या प्रश्नाची माहिती करून दिली. "आपणही माझ्याबरोबर चला," असा आग्रह केला, "हा पक्षाचा प्रश्न नाही!" मी म्हणालो, "तुम्हा-आम्हा सर्वांचे हे कर्तव्य आहे!"

तो भला माणूसही कोणत्याही सबबी न सांगता येण्यास तयार झाला!

बँकेच्या उद्घाटनाचा कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. मी माझ्या उद्घाटनाच्या भाषणात म्हणालो, "एरव्ही मी असल्या कार्यक्रमाला यायचे कबूल करीत नसत; पण जनता पक्षाचे शेती आणि ग्रामीण विभाग-विकासाचे जे धोरण जाहीर झाले आहे, त्या पार्श्वभूमीवर बँकेलादेखील खूप काही करता येईल, असा माझा समज आहे. ग्रामीण जनतेचा पुरुषार्थ जागृत करून तो जोपासण्याचे महत्त्वाचे

काम आहे. त्यात बँकेलाही बरेच काही करता येईल बँकेने ठेवी जमवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नागरिकांनी आपल्या मुलाच्या नावे खाते उघडावे, आणि जेवढी बचत करता येईल, तेवढी ठेव त्या खात्यात ठेवावी. मुलासाठी तो 'भविष्यनिधी' होईल पण त्याचबरोबर समाजालाही विद्यमान परिस्थितीत त्याचा फार उपयोग होईल. ज्या कोणाला 'पिण्या'चा षोक असेल, त्याने निदान मुलांसाठी तरी आठवडयातून दोन दिवस मोह आवरावा. होईल ती बचत मुलाच्या खात्यात भरावी! भ्रष्टाचार जसा केवळ क़ायदे करून संपवता येत नाही, तशी दारूबंदीही केवळ कायद्याने यशस्वी होणार नाही. आपल्या बँकेने केवळ उत्पादनासाठी कर्ज देऊन भागणार नाही. माणसाच्या ज्या प्रापंचिक, अत्यावश्यक गरजा असतात, त्यांसाठीही बँकेने कर्जरूपाने मदत केली पाहिजे. केवळ रुपया-पैशांचा नफा पाहून आपल भागणार नाही. तेच एक यशाचे गमक नाही. सर्वसाधारण समाजाचे भले कशात आहे, तेही पहावयास पाहिजेच."

समारंभाचे अध्यक्ष श्री शिवराज पाटील यांचे अध्यक्षीय भाषणही चांगले झाले. ते विनोदाने म्हणाले, "एस् एम् जोशी उद्घाटक आणि मी अध्यक्ष, यावरून कोणी भलतेच निष्कर्ष काढू नयेत! विधायक कार्यात सर्वांनीच पक्षनिरपेक्षपणाने काम केले पाहिजे हे त्यांचे म्हणणे मला मान्य आहे."

समारंभ संपल्याबरोबर अष्टघाला जावयाचे आम्ही ठरवले होते. परंतु पन्नालालना घेऊन गेलेली जीप परतली नव्हती. एवढा उशीर का झाला, आम्हालाही कळेना. तेव्हा फावल्या वेळात जेवणाचा कार्यक्रम आम्ही उरकून घेतला.

दोन वाजले. तरीही जीप आली नाही. शेवटी शिवराज पाटलांनी पंचायत समितीच्या अध्यक्षांना त्यांची जीप घेऊन येण्याची विनंती केली. आम्ही अष्टघाकडे निघालो. शिवराज पाटलांनीच चाकाचा ताबा घेतला. मुख्य रस्ता सोडून ती कच्च्या रस्त्याला लागली. तो रस्ता इतका वाईट होता की आपण अष्टघापर्यंत पोचू की नाही, अशी शंका मनात उभी राहिली! एकदा जीप बंददेखील पडली— पण शेवटी कसेबसे अष्टे गाठले.

'एक गाव—एक पाणवठा' अशी चळवळ जरी यशस्वी करायची, तर जोडरस्तेही चांगले हवेत; त्यांच्यावर होणारा खर्च अनाठायी समजून भागणार नाही. खेडे आणि शहर यांचे दळणवळण जितके सुलभ होईल, तितकी सामाजिक अभिसरणाची प्रक्रियाही झपाट्याने होऊ लागेल.

आम्ही गावाजवळ पोचलो. गावाबाहेर ४०–५० माणसांचा एक घोळका बसून वादविवाद करीत असताना दिसला.

जीप पाहिल्याबरोबर ते उभे राहिले, परंतु आम्ही त्यांच्यासाठी न थांबता पन्नालाल वगैरे बसले होते, तिकडे गेलो. तोपर्यंत काय घडले होते ते त्यांनी सांगितले. बराच विचारविनिमय झाल्यानंतर दलित आणि सवर्ण, दोघांनीही सांगितले, "आम्ही आपसांत बसून काय तो निर्णय करू. त्यासाठीच तो घोळका एके ठिकाणी बसला आहे."

बऱ्याच चर्चेनंतर त्यांनी आपसांत तडजोड केली.

दलितांच्या विहिरीचे पाणी उन्हाळ्यामुळे आटले होते. म्हणून गावातील सार्वजनिक विहिरीवर त्यांना पाणी भरू द्यावे, अशी मागणी होती. केवळ माणुसकी म्हणूनसुद्धा ती मान्य व्हायला हरकत नव्हती परंतु आमची रूढीप्रियता इतकी जबरी आहे की, ती माणुसकीची पर्वा करीत नाही! तसे पाहिले, तर गावची बहुसंख्य 'सवर्ण' दलितांच्या मागणीशी सहमत होती. 'आम्ही एकत्र बसून भाकरी खाऊ शकतो! वाटले तर दलितांना विचारून पहा'—दलितांनी त्यांचे म्हणणे खरे असल्याची ग्वाही दिली. प्रश्न होता सत्तरी ओलांडलेल्या काही म्हाताऱ्या मंडळींचा. ते आपला आग्रह सोडायला काही तयार होईनात. शेवटी, "तुम्ही वाटल्यास भरा— आम्ही सवर्ण काही पाणी भरणार नाही!" असा पवित्रा म्हाताऱ्यांच्या आग्रहाखातर सवर्णांनी घेतला. दलित मंडळी त्याला तयार नव्हती. "तुम्ही पाणी भरणार नसाल, तर आम्हाला तरी ते भरून काय करायचे?" ते म्हणाले.

वरवर पाहिले तर ही भूमिका अडवणुकीची आहे पण त्यात माणुसकी दडलेलीही दिसते. शिवाय हा तंटा सुरू झाल्यावर गांवातील चार दोन उच्छृंखल पोरांनी एका दलिताला गाठून सपाटून मारहाण केली होती. जोड्यांचाही वापर करण्यात आला होता

गुन्हा नोंदवला गेला. पोलिसांची ये—जा सुरू झाली. आम्ही पोचलो, त्या वेळी पोलिस तेथे होतेच. एकाला तर आम्ही आपल्या जीपमध्ये 'लिफ्ट' दिला होता. पोलिस म्हणाले, "पुरावा मिळत नाही! मारहाण झाली, हे खरेच, पण पुरावा नसेल, तर काय उपयोग?" म्हणजे गुन्हेगाराला शिक्षा नाहीच, आणि कटुता मात्र वाढणार!

आम्ही गेल्यानंतर थोड्याच वेळात दोन्ही पक्षांना आपसांत तडजोड घडवून आणली. मग पाटलाकडे चहापाण्याचा कार्यक्रम झाला. तेव्हा आम्ही या पोलिस खटल्याचे काय करायचे, यावर विचार करू लागलो. गावकरी म्हणाले, "जे काही घडले, त्याबद्दल आम्ही माफी मागतो. ज्याला मार बसला, त्यालाही बोलावून आणले. मार चांगलाच पडला होता. पाठीवर वळही होते. पण गुन्हा करणारा आरोपी काही पुढे येत नव्हता. आम्ही गावकऱ्यांना सांगितले, "या वाड पोरांना तुम्ही समजावले पाहिजे आणि त्यानीच दिलगिरी व्यक्त करायला भाग पाडले पाहिजे."

अर्थात्, असे काही घडेल, अशी मला तरी काही आशा नव्हती. अशा वेळी कर्म करीत राहणे, एवढाच आपला अधिकार उरतो.

चहापाण्याचा कार्यक्रम आटोपून आम्ही उमरग्यास परतलो, कार्यकर्त्यांच्या मेळाव्यापुढे मार्गदर्शन करून उस्मानाबादला सभेसाठी जावयास निघालो. तेवढ्यात दलित पुढारी श्री रोग आले. त्यांनी आग्रह धरला की, तहसीलीत उपोषण करणाऱ्या त्यांच्या मित्रांना आम्ही जाऊन भेटावे, आणि त्यांचे उपोषण संपवावे. त्यांच्या उपोषणाला चार दिवस झाले होते. आम्ही तेथे गेलो. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. एका दलितवर्गीयाने दुसऱ्या एका दलितवर्गीयाला जमीन विकली. त्या जमिनीच्या काही भागात दलितांचा मसणवटा होता. ज्याने जमीन घेतली, त्याने ती वहिवाटीला आणली. काही दिवसांपूर्वी एका दलिताचा मृत्यू झाला, त्याचे प्रेत पुरण्यास आडकाठी केली. तशातही मारूनमुटकून दफनविधी उरकण्यात आला. आमचे मित्र शिवराज पाटील यांनी आश्वासन दिले की, तुमचा वहिवाटीचा हक्क सिध्द करता येत असेल तर शासनाकडून तुमची मागणी मान्य करून घेण्याचा प्रयत्न करू. कायद्याने तसे करण्यास अडचण असेल, तर दिवाणी कोर्टात तुम्ही दावा दाखल करा. वकील वगैरे सर्व तजवीज आम्ही करू.

के आश्वासन मिळाल्यावर आता तुम्ही उपोषण सोडावे," असे म्ही त्यांना सांगितले. त्यांनीही ते मान्य केले.

या दिवशी सकाळी मी, विमलचंद आणि कठारे कलेक्टरांना टलो. त्यांना मी सारी हकीगत सांगितली. त्यांना त्या केसची संपूर्ण हिती होती. "या लोकांचा वहिवाटीचा हक्क आहे. शासन टल्यास ती जागा 'अॅक्वायर' करूनही देईल; परंतु या कांनी तुम्हाला सर्व माहिती दिलेली नाही! 'हे स्मशान एकाच र्व्हे नंबरात नाही दोन सर्व्हे नबरांत आहे. या मंडळींचा आग्रह एका बरातील जमिनीसाठीच आहे! तसे करता येणार नाही. त्यापेक्षा म्ही दसरीकडे स्मशानासाठी जागा देऊ; ते पसंत नसेल तर दोन्ही बरांतील जागा घ्यावी लागल!" कलेक्टर म्हणाले

लेक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे या सर्व प्रकारात थोडसे राज-रण आहे. ते कसेही असल तरी कलेक्टरांचे म्हणणे सयुक्तिक होते. प्रमाणे कार्यवाही केल्यास माझे समाधान होईल, असे सांगून म्ही त्यांचा त्यांचा निरोप घतला

वण करून उस्मानाबादहून सोलापुरला येण्यासाठी निघालो. श्री प्पासाहेब काडादी यांच्याकडे डॉ अंत्रोळीकर वगैरे आमची वाटच पहात होते. चार वाजता कार्यकर्त्यांपुढे भाषणाचा कार्यक्रम ठरलेला होता. वेळ अडनिडी असूनही सात–आठशे स्त्री-पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते. "इंदिराजींच्या कॉंग्रेसकडून सत्ता हस्तगत करण्याचा आपला कार्यक्रम आता जवळपास संपला आहे. तीन-चार राज्यांत निवडणुका व्हायच्या आहेत; योग्य वेळी त्या होतीलच. आणि त्या तुम्ही जिंकालच, परंतु आता मुख्य प्रश्न तुमच्या आमच्या सामूहिक पुरुषार्थाचा आहे. लढाई संपली; परंतु युद्ध संपलेले नाही सामाजिक आणि आर्थिक विषमतेमुळे आपल्याकडे 'सतत आणीबाणी' चालू आहे–ती कशी संपवायची, हा प्रश्न आहे तुमच्या–आमच्या सामूहिक पुरुषार्थानेच ते होऊ शकेल महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न अजून साकार व्हायचे आहे. सामाजिक, आर्थिक विषमता नष्ट करूनच ते साकार होऊ शकेल आपली सामाजिक जाणीव अजून जातीपुरती मर्यादित आहे; ती राष्ट्राच्या पातळीवर गेली पाहिजे; तसे व्हावे–यासाठीच जनता पक्षाला अहर्निश परिश्रम करावे लागतील. काळाचे हे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे तोच खऱ्या अर्थाने पुरुषार्थाचा मार्ग आहे."

ठरल्या वेळी गाडी गाठून रात्री पुण्यास येऊन पोचलो.

◎ ◎

---

# मुस्लिम महिलांचे उत्साहजनक शिबिर

कोल्हापूरच्या सर्वोदय विद्यालयाच्या जागेत मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि समाजवादी महिला सभा यांच्या संयुक्त विद्यमाने मुस्लिम महिलांचे शिबिर भरले होते अशा प्रकारचे बहुधा त्या भागातल पहिलच शिबिर सल्यान काहीशी धास्ती आणि काहीशी त्सुकता अशी सुरुवातीला बऱ्याच स्त्रियांची नःस्थिती होती. पण थोड्याच काळात ही नःस्थिती बदलली आणि दहा दिवसांपूर्वी आलेल्या भगिनी त्या ह्याच काय, असाच कोणालाही प्रश्न पडावा असा बदल झाल्याचे दिसून आले.

शिबिराच्या कार्यक्रमात शिवणकाम, भरत, काम, हस्तकौशल्य यांना स्थान असल्याने मात स्त्रिया चटकन रममाण झाल्या त्यानंतर गप्पागोष्टींच्या रूपाने विविध विषयांबद्दल बोलणे सुरू झाले आणि त्या स्त्रिया भाग घेऊ लागल्या. बोलता बोलता त्या विचार करू लागल्या, आणि आपणही विचार करू शकतो ह्या अनुभवाने एक आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला. त्यानंतरचे अभ्यास-वर्ग त्यांना अधिक रोचक वाटले. आरोग्या-बाबत आपल्याला काहीच कसे समजत नव्हते याचे नवल त्यांना वाटले. आहाराबद्दल इतक्या प्रकारांनी विचार केला जाऊ शकतो, हा त्यांना एक नवीनच साक्षात्कार होता. बालसंगोपन म्हणजे एक नवेच दालन होते. कायद्याची माहिती त्यांना प्रथमच समजत होती अशा माहितीच्या अभावी व्यर्थच आपण असहायता भोगतो हे त्यांना कळून आले. कायद्याचे राज्य म्हणजे दुबळ्या, अगतिक लोकांना केवढा दिलासा असतो! पण त्याची माहितीच त्यांच्यापर्यंत कधी पोचत नाही आणि पोचली तर त्यांच्या आवाक्यात ते येण्याचा मार्ग त्यांना उपलब्ध नसतो. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची कोल्हापूर शाखा या-बाबत जे कार्य करीत आहे त्यामुळे तलाक–सवत या कात्रीतून सुटण्याचा मार्ग आपल्याला सापडू शकेल, अशी आशा त्यांना वाटू लागली तर नवल नाही.

२ जूनला शिबिराचा समारोप होता श्रीमती जमादार यांनी प्रास्ताविक भाषण केले. त्यांचे पती हुसेन भाई या वेळी मुले सांभाळत होते, हे नव्या युगाचे एक प्रसादचिन्हच म्हणायला पाहिजे.

बेबी अमीन सय्यद शिबिरातले अनुभव सांग-ताना म्हणाली, "आम्हाला या शिबिरामुळे मोकळेपणाचा उत्साहवर्धक अनुभव आला. नाहीतर बुरख्याआडच्या जगातच आम्ही कुचंबत असतो. वर्तमानपत्रांचे दर्शनसुद्धा आम्हाला होत नाही. दुनियेशी बेखबर असे आमचे जिणे वर चार सवतींची आणि तलाकची टांगती तलवार माणुसकीला जणू आम्ही पारख्या झालेल्या होतो. आता या शिबिराने आम्हाला नवा प्रकाश दिला आहे"

आयेशाबाई म्हणाल्या, "या शिबिरामुळे उत्तम विचार आम्हाला ऐकायला मिळाले. अन्यायाची जाणीवच आम्हाला नव्हती, अशी आमची स्थिती होती. अन्यायनिवारणाची मग गोष्टच कुठली! आता न्यायान्यायाची जाणीव आम्हाला झाली आहे आणि आता आम्हाला संघटित शक्तीचे भानही आले आहे. आम्ही आता स्वस्थ बसणार नाही."

शेवटच्या दिवशी सांगलीला शिबिरातील भगिनी सहलीला गेल्या आणि तिथल्या विविध महिला संस्थांच्या कामकाजाची माहिती त्यांनी उत्सुकतेने करून घेतली.

बालवाड्या, शिवण वर्ग अंशकालीन रोजगार अशी विविध कामे आता मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या महिला कार्यकर्त्या हाती घेणार आहेत. कांचनमाला नाईक, ऊर्मिलाबाई सबनीस आणि इतर सामाजिक कार्यकर्त्या त्यांना मदत करणार आहेत. ◎ ◎